19-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 18-05-2025 22:01 Page 1



## निवडक




**शिवोली : मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची भेट घेऊन त्यांना जगातील सर्वाधिक किमतीचा नियाजकी जातीचा आंबा भेट देताना राजेश धारगळकर.**

## शिवोली येथील राजेश धारगळकर यांनी पिकवला जगातील सर्वात महागडा आंबा

*टीम दैनिक हेराल्ड*

**शिवोली, दि. १७ :** शिवोली येथील आंबा बागायतदार सिव्हिल इंजिनिअर असलेल्या राजेश धारगळकर या युवकाने आपल्या बागायतीत निजायकी ( टायगो ) या जपानी आंब्याच्या कलमाची लागवड करून त्यापासून १ ते दीड लाख ( वजनाप्रमाणे) जागतिक बाजारपेठेत किंमत असलेल्या आंब्याची कलमे लावून यावर्षी त्यापासून आंब्याचे पीक घेतले. एका आंब्याचे वजन कमीत कमी ५०० ग्रॅम भरते या आंब्याचा जागतिक बाजारपेठेत एका किलो मागे २ ते ३ लाख रुपये भाव मिळतो. राजेश धारगळकर याने आपल्या बागेत पिकलेले पहिले या जातीच्या आंब्याचे फळ गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना भेट दिले यावेळी डॉ प्रमोद सावंत यांनी राजेशच्या या अद्वितीय कामगिरी बद्दल अभिनंदन केले.स्वतः सिव्हिल इंजिनिअर असूनही राजेशने स्वतःचा आंबा बागायतदार व्यवसाय सुरू केल्याबद्दल त्याचे मुक्त कंठाने कौतुक केले तसेच त्याला या व्यवसायात सरकारकडून आवश्यक ते सहकार्य करण्याचे वचन दिले.

शिवोली येथील राजेश धारगळकर हा सिव्हिल इंजिनिअर असलेला युवकाला लहानपनापासूनच शेती बागायतीची आवड होती.त्याने सिव्हिल इंजिनिअरचे शिक्षण घेऊन सुरवातीला क्रीडा युवा व्यवहार खात्यात नोकरी पत्करली मात्र त्या ठिकाणी त्याचे मन रमत नसल्याने त्याने ती नोकरी सोडून आंबा बागायतदार म्हणून स्वतःचा व्यवसाय सुरू केला गावा गावातील आंब्याची कलमे घेऊन त्याचे आंबे बाजारपेठेत विकण्याचा त्यांचा गेल्या २५वर्षापासूनच

स्वतंत्र व्यवसाय आहे.गोव्यातील प्रामुख्याने मानकुराद, हापूस, मागेल, पायरी, मुशारद, मालगेस आदी जातीच्या आंब्यांचा व्यवसाय करण्या बरोबर स्वतःची त्यांची आंब्याची बागायती आहे. त्यात नवनवीन जातीच्या आंब्याच्या झाडाची लागवड ते करीत असतात.

राजेशने १७ ऑक्टोबर २०२१ रोजी बंगाल येथून ( साडे तीन वर्षा पूर्वी) नियजाकी या जपानी जातीच्या आंब्याचे कलमं २५०० रुपये किमतीचे कलम आणले त्याची लागवड करून त्याची तीन वर्षे योग्य निगा राखली.त्याला नित्य नियमाने पाणी,सेंद्रिय खत,कीटक नाशके देऊन त्याचा सांभाळ केला. खास करून कुजलेल्या भाजीपाल्याचे खत आपण या झाडाना वापरल्याचे धारगलकर यांनी सांगितले. गेल्या डिसेंबर महिन्यात त्याला पहिला मोहर आला.त्यानंतर फलधारणा झाली आता मे महिन्यात आंबे मिळाले त्याचे मला समाधान आहे.

अशा प्रकारचे नवनवीन आंब्याच्या जाती निर्माण केल्या जाऊ शकतात त्यातून आंबा बागायतदारना चांगला भावही मिळतो मात्र त्यासाठी जागतिक बाजारपेठ मिळावी यासाठी मी मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांची भेट घेऊन त्यांच्याशी याबाबत चर्चा केली मुख्यमंत्री या बाबतीत सकारात्मक आहेत त्यांनी सर्वोतोपरी मदत देण्याचे मान्य केले आहे त्यामुळे माझा हुरूप आणखीन वाढल्याचे त्यांनी सांगितले.

---

## 'आयपीएल २०२५'मधल्या मॅचविनर खेळाडूला करोना

**नवी दिल्ली, दि. १८ :** करोनाची पुन्हा एकदा एंट्री आयपीएलमध्ये झाली असल्याचे समोर येत आहे. कारण एका मॅचविनर खेळाडूला करोनाची बाधा झाली आहे. या मॅचविनर खेळाडूला संघात बोलावण्यात आले असले तरी टीमचे मोठे नुकसान होणार आहे.

जेव्हा २020 साली करोना आला होता तेव्हा आयपीएल बंद करावी लागली होती. कारण आयपीएलमधील बऱ्याच जणांना करोनाची लागण होत होती. त्यामुळे बीसीसीआयने आयपीएल काही काळासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतरची आयपीएल युएईमध्ये खेळवण्यात आली होती. त्यामुळे बीसीसीआयचे बरेच नुकसानही झाले होते. आता पुन्हा एकदा आयपीएलमधल्या खेळाडूला करोना झाल्यचो समोर आले आहे. आयपीएलमध्ये ज्या खेळडूने आपली दहशत निर्माण केली होती, गोलंदाजांचा कर्दनकाळ ज्याला म्हटले जायचे, त्या सनरायझर्स हैदराबादच्या संघातील सलामीवीर असलेल्या ट्रेव्हिस हेडला करोनाची लागण झाली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढलेला होता. त्यामुळे आयपीएल काही दिवसांसाठी स्थगित करण्यात आली होती. त्यावेळी ट्रेव्हिस हेडसह बरेच खेळाडू मायदेशी परतले होते. ट्रेव्हिस हेड हा ऑस्ट्रेलियाचा. आपल्या देशात गेल्यावर त्याला करोनाची लागण झाली. पण आता आयपीएल सुरु होणार असल्याचे कळताच तो पुन्हा भारतामध्ये परतणार आहे. पण तो आता भारतामध्ये परतणार असला तरी हैदराबादच्या संघाचे नुकसान होणार आहे.

# पंजाबचा राजस्थानवर दणदणीत विजय

### राजस्थान रॉयल्सवर १० धावांनी मात | या विजयासह पंजाब प्लेऑफच्या आणखी

**जयपूर, दि. १८ :**

पंजाब किंग्जने राजस्थान रॉयल्सचा १० धावांनी पराभव केला. या सामन्यात पंजाब संघाने प्रथम फलंदाजी करत २१९ धावा केल्या, ज्याच्या प्रत्युत्तरात राजस्थानला निर्धारित २० षटकांत फक्त २०९ धावा करता आल्या. या सामन्यात विजय मिळवून पंजाबने प्लेऑफमधील आपले स्थान जवळजवळ निश्चित केले आहे. पंजाबच्या विजयात नेहल वधेरा आणि हरप्रीत ब्रारने सर्वात मोठे योगदान दिले. वधेराने ७० धावा केल्या आणि हरप्रीतने ३ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या.



जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात राजस्थान रॉयल्सना २२० धावांचे लक्ष्य मिळाले. प्रत्युत्तरात यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशीने आपल्या संघाला झंझावाती सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून पाचव्या षटकातच संघाचा धावसंख्या ६० धावांच्या पुढे नेला. दरम्यान, सूर्यवंशी १५ चेंडूत ४० धावा करून बाद झाला. यशस्वी जयस्वालने एका टोकाला धरून ठेवले पण अर्धशतक पूर्ण केल्यानंतर लगेचच तो बाद झाला. जयस्वालने त्याच्या डावात २५ चेंडूत ९ चौकार आणि १ षटकारासह ५० धावा केल्या.

या सामन्यात संजू सॅमसनने पुनरागमन केले, पण तो फक्त २० धावा करून बाद झाला. संघाला रियान परागकडून मोठ्या खेळीची आवश्यकता होती, तो १३ धावांवर हरप्रीत ब्रारने क्लीन बोल्ड झाला. मोठी भागीदारी नसल्यामुळे राजस्थानच्या अडचणी वाढत होत्या. ध्रुव जुरेल एका टोकाला आयर्न मॅनप्रमाणे धरून होता, पण त्याला दुसऱ्या टोकाकडून साथ मिळत नव्हती. ध्रुव जुरेल आणि शिमरॉन हेटमायर यांच्यात ३% धावांची भागीदारी झाली, तर ११ धावा काढून हेटमायर बाद झाला तेव्हा राजस्थानला विजयासाठी १६ चेंडूत ३९ धावा करायच्या होत्या.

राजस्थान रॉयल्सला शेवटच्या षटकात ३० धावा करायच्या होत्या. १९ व्या षटकात अर्शदीप सिंग गोलंदाजी करायला आला, ज्यामध्ये त्याने फक्त ८ धावा दिल्या, ज्यामुळे सामना पंजाबच्या बाजूने झाला. मार्को यान्सेन शेवटचे षटक टाकले, त्याच्या पहिल्या ४ चेंडूंनंतर सामन्याचा निकाल लागला. पहिल्या दोन चेंडूंवर फक्त दोन धावा आल्या, तर पुढच्या दोन चेंडूंवर त्याने ध्रुव जुरेल आणि वानिंदू हसरंगा यांना बाद केले. शेवटच्या २ चेंडूंवरील दोन चौकारांचा राजस्थानला कोणताही फायदा झाला नाही.

### नेहल आणि शशांकची अर्धशतकी खेळी

**नेहल वढेरा आणि शशांक सिंह या जोडीने केलेल्या झंझावाती अर्धशतकी खेळीच्या जोरावर पंजाबने राजस्थान रॉयल्स विरुद्ध सवाई मानसिंह स्टेडियममध्ये २00 पार मजल मारली आहे. पंजाबने राजस्थानसमोर २२0 धावांचं आव्हान ठेवलं आहे. पंजाबने २0 ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून २१९ रन्स केल्या. पंजाबकडून नेहल आणि शशांक या दोघांव्यितिरिक्त कर्णधार श्रेयस अय्यर, प्रभसिमरन सिंह आणि अझमतुल्लाह ओमरझई या तिघांनीही छोटेखानी मात्र निर्णायक खेळी केली. फलंदाजांनी त्यांची भूमिका चोखपणे पार पाडली. त्यानतंर आता पंजाबचे गोलंदाज २१९ धावांचा यशस्वी बचाव करत राजस्थान विरुद्ध विजय मिळवण्यात यशस्वी ठरतात का? याकडे क्रिकेट चाहत्यांचं लक्ष असणार आहे.**

# कोलकता प्लेऑफमधून बाहेर

- **उर्वरित सामन्यांसाठी रोवमन पॉवेलच्या जागी शिवम शुक्ला करारबद्ध**

**मुंबई, दि. १८ :**

भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी संघर्षामुळे आयपीएल थांबवण्यात आले होते, ज्यामुळे सर्व परदेशी खेळाडू घरी गेले. जेव्हा लीग सुरू झाली तेव्हा बरेच परदेशी खेळाडू भारतात परतले नाहीत, त्यापैकी एक वेस्ट इंडिजचा रोवमन पॉवेल होता. आता केकेआरने त्याच्या जागी गूढ फिरकी गोलंदाजाला समाविष्ट केले आहे. संघाने रविवारी ही घोषणा केलेली पाहायला मिळाली.

कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएल २०२५ च्या उर्वरित सामन्यांसाठी रोवमन पॉवेलच्या जागी मध्य प्रदेशचा फिरकी गोलंदाज शिवम शुक्लाला करारबद्ध केले आहे. उंचीने लहान असूनही, शुक्लाकडे सईद अजमलसारखीच गोलंदाजी करण्याची पद्धत आहे, जी त्याला दुसऱ्या, ऑफ–स्पिनर आणि टॉप–स्पिनर अशा विविध चेंडूंनी फलंदाजांना फसवण्यास मदत करते. शनिवारी बेंगळुरूमध्ये झालेल्या सततच्या पावसामुळे सामना वाया गेल्याने, केकेआरचा आता या हंगामात फक्त एकच सामना शिल्लक आहे, तो पुढील आठवड्यात दिल्लीत सनरायझर्स हैदराबादविरुद्ध.



केकेआर आधीच स्पर्धेतून बाहेर पडल्यामुळे, गतविजेते शुक्लाला संधी देऊ शकतात जेणेकरून जर त्याने चांगली कामगिरी केली तर त्यांना भविष्यात संघात समाविष्ट करता येईल. पर्पल आर्मीकडे आधीच सुनील नरेन आणि वरुण चक्रवर्ती ही मजबूत फिरकी जोडी आहे. मध्य प्रदेशच्या शिवमने मध्य प्रदेश टी– २० लीगच्या पहिल्याच हंगामात सर्वांना प्रभावित केले. त्याने एका सामन्यात पाच विकेट्ससह १0 विकेट्स घेतल्या आणि सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज म्हणून त्याला पर्पल कॅप देण्यात आली. २०२४–२५ च्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये, त्याने मध्य प्रदेशसाठी आठ सामन्यांमध्ये आठ विकेट्स घेतल्या, ज्यामध्ये सौराष्ट्रविरुद्धच्या चार विकेट्सचा समावेश होता.

पॉवेल आणि मोईन अली आयपीएल २०२५ च्या शेवटच्या सामन्यांसाठी परतले नाहीत. वेस्ट इंडिजच्या माजी टी२0 कर्णधाराला अज्ञात दुखापत झाली आणि केकेआर स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर, पॉवेलने परत न येण्याचा निर्णय घेतला. गतविजेत्यांसाठी हा हंगाम चांगला गेला नाही कारण इतके पर्याय असूनही त्यांच्या फलंदाजीत सातत्य राहिले नाही.

# भारत–इंग्लंड कसोटी पूर्वी दोन खेळाडू संघा बाहेर

- **फ्रेडी वाइल्ड आणि नॅथन लीमन संघातून बाहेर**
- **इसीबी चा निर्णय**

**मुंबई, दि. १८ :**

भारतीय क्रिकेट संघ पुढील महिन्यात इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. २० जूनपासून सुरू होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यावर टीम इंडिया ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेच्या सुमारे एक महिना आधी यजमान इंग्लंडने एक मोठे पाऊल उचलले आहे. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (इसीबी) एक मोठा निर्णय घेतला.

इंग्लंड क्रिकेट बोर्डाने त्यांचे दोन डेटा विश्लेषक फ्रेडी वाइल्ड आणि नॅथन लीमन यांना संघातून काढून टाकले आहे. मुख्य प्रशिक्षक ब्रेंडन मॅक्युलम यांचा असा विश्वास आहे की खेळाडूंनी कसोटी क्रिकेटमध्ये आकडेवारीवर आधारित खेळण्यापेक्षा त्यांच्या अनुभवावर आणि अंतर्ज्ञानावर अधिक अवलंबून राहावे. इंग्लंडच्या नवीन जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची सुरुवात २० जूनपासून हेडिंग्ले येथे सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेने होत आहे. अशा परिस्थितीत, हा निर्णय संघाच्या काम करण्याच्या पद्धतीत मोठा बदल मानला जात आहे.

'द डेली टेलिग्राफ'मधील एका वृत्तानुसार, इंग्लंड संघ त्यांच्या खेळाच्या रणनीतीमध्ये डेटा ॲनालिटिक्सची भूमिका मर्यादित करणार आहे. अहवालात म्हटले आहे की नॅथन लीमन (वरिष्ठ डेटा



विश्लेषक) आणि फ्रेडी वाइल्ड (मर्यादित षटकांचे विश्लेषक) आता संघासोबत राहणार नाहीत. या महिन्याच्या अखेरीस वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या एकदिवसीय आणि टी–२० मालिकेतही हे दोघे संघाचा भाग असणार नाहीत. या मालिकेत हॅरी ब्रुक पहिल्यांदाच इंग्लंडच्या मर्यादित षटकांच्या कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारणार आहे.

ब्रेंडन मॅक्युलमचा असा विश्वास आहे की टी–२० क्रिकेटसाठी डेटा–आधारित रणनीती काम करू शकतात, परंतु कसोटी क्रिकेटमध्ये खेळाडूंनी त्यांच्या खेळाच्या जाणिवेनुसार आणि मैदानावरील अनुभवानुसार निर्णय घेतले पाहिजेत. सपोर्ट स्टाफची संख्या मर्यादित केल्याने ड्रेसिंग रूममध्ये अधिक आरामदायी वातावरण निर्माण होण्यास मदत होते. इंग्लंडमध्ये, खेळाडूंना आता त्यांची इच्छा असल्यास वैयक्तिकरित्या विश्लेषकांकडून सल्ला घेण्याची परवानगी असेल, परंतु संघ पातळीवर, अंतर्ज्ञान आणि मैदानी परिस्थितीला प्राधान्य दिले जाईल. या बदलानंतर, इंग्लंडची ही नवी रणनीती भारतीय संघाविरुद्ध किती प्रभावी ठरते हे पाहणे मनोरंजक ठरेल.

# आरसीबी विरुद्ध केकेआर सामना पावसामुळे रद्द

### केकेआरचा पत्ता कट | बंगळुरुची प्लेऑफची प्रतिक्षा कायम

**बंगळुरू, दि. १८ :**

आयपीएलच्या १८ व्या मोसमातील ५८ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स आमनेसामने होते. या सामन्याचे आयोजन हे बंगळुरुतील एम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये करण्यात आले होते. मात्र पावसामुळे हा सामना रद्द करण्यात आला आहे. स्टेडियम आणि आसपासच्या परिसरात गेल्या काही तासांपासून पावसाची जोरदार बॅटिंग सुरु होती. त्यामुळे बराच वेळ पाऊस थांबण्याची आणि खेळपट्टी कोरडी होण्याची प्रतिक्षा करण्यात आली. मात्र खेळ होऊ शकणार नसल्याचे स्पष्ट होताच सामना रद्द करण्याची घोषणा करण्यात आली. आयपीएलकडून एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरुन याबाबतची माहिती देण्यात आली आहे. आयपीएलच्या १८ व्या मोसमातील सामना पावसामुळे रद्द होण्याची ही तिसरी वेळ ठरली.



आरसीबी विरुद्ध केकेआर सामन्याला नियोजित वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी सुरुवात होणं अपेक्षित होतं. तर त्याआधी ७ वाजता टॉस होणार होता. मात्र चिन्नास्वामी स्टेडियममध्ये जोरदार पाऊस सुरु होता. त्यामुळे क्रिकेट चाहत्यांकडे पाऊस थांबण्याची प्रतिक्षा करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नव्हता. तर दुसऱ्या बाजूला पावसाची बॅटिंग सुरु होती. काही वेळ पाऊस थांबल्याने ग्राउंड स्टाफने खेळपट्टी कोरडी करण्यासाठी फार मेहनत घेतली. मात्र पावसाने पुन्हा सुरुवात केली. मात्र चाहत्यांना सामना सुरु होणार, अशी आशा होती.

पंचांनी पाऊस थांबल्यानंतर मैदानाची पाहणी केली. मात्र काही वेळानंतर सामना होणार नसल्याचं स्पष्ट झालं. दोन्ही संघांच्या खेळाडूंनी हस्तांदोलन केलं आणि यासह सामना टॉसशिवाय रद्द झाल्याचं स्पष्ट झालं. अशाप्रकारे रात्री १० वाजून ३० मिनिटांनी सामना रद्द करण्याची अधिकृत घोषणा करण्यात आली.

सामना रद्द झाल्याने दोन्ही संघाना प्रत्येकी १–१ गुण देण्यात आला. केकेआरचं यासह १३ सामन्यांनंतर १२ गुण झआले. तर यासह गतविजेत्या कोलकाताचे प्लेऑफमधील आव्हान संपुष्ठात आलं आहे. केकेआर या १८ व्या मोसमातून बाहेर पडणारी चौथी टीम ठरली आहे. तर आरसीबीच्या खात्यात १ गुण जोडला गेला. त्यामुळे आरसीबीच्या खात्यात १२ सामन्यानंतर १७ गुण झाले आहेत. मात्र त्यानंतरही आरसीबी प्लेऑफसाठी क्वालिफाय होऊ शकलेली नाही.

# टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे मधला रॉयलझ संघास जेतेपद

*टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. १८ :** मधलावाडा – सावईवेरे येथील फ्रेंड्स सर्कल संघातर्फे आयोजित केलेल्या मधलावाडा प्रीमियर लीग २.० (एम् .पी.एल्) फ्लडलाईट टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद मधला रॉयलझ संघास मिळाले तर उपविजेतेपद मधला अवेंजर्स संघास मिळाले.



**सावईवेरे : एम. .पी. एल. क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या मधला रॉयलझ संघासोबत हेमंत कासार, अक्षय नाईक व लक्ष्मीकांत वेरेकर.**

या स्पर्धेत मधला स्टलियन्स, मधला ब्लास्टर्स, मधला रॉयलझ व मधला अवेंजर्स अशा चार संघांचा समावेश होता.स्पर्धेचा मालिकावीर – गजानन वेरेकर ( मधला रॉयलझ) , उत्कृष्ट फलंदाज – विनायक मायणीकर (मधला रॉयलझ), उत्कृष्ट गोलंदाज – दर्शन पालकर (मधला अवेंजर्स) , सामनावीर – दीप्तेश पालकर (मधला रॉयलझ) यांना वैयक्तिक बक्षिसे मिळाली.

स्पर्धेचे उद्घाटन मदनंत क्रिकेट क्लबचे सचिव हेमंत कासार, माजी जिल्हा पंचायत सदस्य मोहन वेरेकर, पंच सदस्य अक्षय नाईक व प्रमोद बांदोडकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. बक्षीस वितरण सोहळा हेमंत कासार, अक्षय नाईक व लक्ष्मीकांत वेरेकर यांच्या हस्ते करण्यात आला.सूत्रनिवेदन व आभारप्रदर्शन सुदीप अभिषेकी यांनी केले.ही स्पर्धा सावईवेरे येथील पंचायत मैदानावर संपन्न झाली.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २५६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 256 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .